सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २११ | गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. चेतन सोनार
आर्किटेक्ट

**दिनविशेष**
२३ एप्रिल

- जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

'वाचन हेच खरे शिक्षण' पान २ वर...

कल्पना सुचली, कचऱ्यामुळे बदलले आयुष्य! पान ३ वर...

# श्रद्धेचा सन्मान, जबाबदारीचे भान, मूर्ती व्यवस्थापनातून समाजापुढे आदर्श

## पालिकेची संवेदनशील भूमिका, नागरिकांची सजग सहभागीता यातून जपूया संस्कृतीची पवित्रता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात नुकतीच घडलेली एक घटना आपल्याला केवळ व्यवस्थापनाचा नव्हे, तर सामाजिक आणि आध्यात्मिक जबाबदारीचा महत्त्वाचा धडा देऊन जाते. येथील काही ठिकाणच्या रस्त्यांवर, तसेच फरशी पुलावर टाकून देण्यात आलेल्या देवतांच्या मूर्तींच्या प्रश्नावर मंगळवार, दि. २० एप्रिल २०२६ रोजी दै 'ग्लोबल महातेज'ने सामाजिक जाणिवेचे उचित भान राखत वृत्त प्रसिद्ध केले. त्यावर पालिका प्रशासनाने तातडीने पुढाकार घेत संवेदनशीलतेने त्यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली. या कृतीतून पालिकेने केवळ प्रशासनिक कर्तव्यच पार पाडले नाही, तर समाजाप्रती असलेले आपले दायित्वही अधोरेखित केले.

ही घटना आपल्याला श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेचा गाभा नव्याने समजून घेण्याची संधी देते. भारतीय संस्कृतीत देवतांच्या मूर्ती केवळ प्रतिकात्मक नसून त्या श्रद्धेचे केंद्रबिंदू असतात. मूर्तीपूजा ही संकल्पना आपल्याला साकारातून निराकाराची अनुभूती देण्याचा मार्ग दाखविते. त्यामुळे अशा मूर्तींचे जतन, पूजन आणि विसर्जन हे केवळ धार्मिक कृत्य नसून भावनांचा आणि परंपरेचा सन्मान असतो.

पालिकेने केलेली कार्यवाही ही सामाजिक भान जपणारी आणि परिस्थितीला योग्य प्रतिसाद देणारी ठरली. मात्र, या घटनेतून नागरिकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची ठरते. श्रद्धेने पूजलेली मूर्ती रस्त्यावर टाकणे ही केवळ असंवेदनशील कृती नसून आपल्या सांस्कृतिक मूल्यांना तडा देणारी बाब आहे. यातून पुण्याचा वाटा मिळण्याऐवजी पापाचेच आपण धनी होत नाही ना? याचाही विचार नागरिकांनी सकारात्मकतेतून करणे गरजेचे आहे. आपल्या धर्मग्रंथांमध्ये आणि परंपरांमध्ये प्रत्येक गोष्टीचा एक शिस्तबद्ध मार्ग सांगितला आहे. श्रीमद्भगवद्गीतेमध्येही कर्तव्य आणि जबाबदारी यांचा समतोल राखण्याचा संदेश दिला आहे. त्यानुसार आपल्या कृतींमध्ये सात्त्विकता आणि सजगता असणे आवश्यक आहे.





आयुष्याला वाट करून देणाऱ्या देवाला वाटेवर ठेवून त्याचीच वाट लावणाऱ्या महाभागांचा फरशी पुलावरील प्रताप...!

सामाजिक संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह; पालिकेने लक्ष पुरविणे गरजेचे

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरातील विविध भागांत अलीकडच्या काळात देवतांच्या मूर्ती रस्त्यावर, कचराकुंड्यांजवळ किंवा फरशी पुलासारख्या ठिकाणी टाकून दिल्याच्या घटना वाढताना दिसत आहेत. श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या मूर्तींचा अशाप्रकारे अवमान अर्थात विटंबना होत असल्याने हा प्रकार म्हणजे सामाजिक संवेदनशीलतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. किंबहुना आयुष्याला वाट करून देणाऱ्या देवाला वाटेवर ठेवून त्याचीच वाट लावणाऱ्या महाभागांकडूनच हा प्रताप घडलेला असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

अमळनेर : श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या देवाच्या मूर्तींची अशाप्रकारे विटंबना येथील फरशी पुलावर होताना दिसत आहे. (छायाचित्र : गणेश सपकाळे)

काही ठिकाणी घरातील जुन्या किंवा तुटलेल्या, फुटलेल्या मूर्ती योग्य पद्धतीने विसर्जित करण्याऐवजी त्या थेट रस्त्यावर टाकल्या जात आहेत. विशेषतः सण-उत्सवानंतर अशा घटनांची संख्या वाढताना दिसते. अनेकदा या मूर्ती कचऱ्यासोबत मिसळलेल्या अवस्थेतही आढळतात. वास्तविक, मूर्तीचे विसर्जन किंवा त्यांची विल्हेवाट लावण्याची एक विशिष्ट पद्धत असते. ती न पाळता अशाप्रकारे मूर्ती फेकणे हे केवळ धार्मिकदृष्ट्या चुकीचे नसून सामाजिक जबाबदारीकडे दुर्लक्ष करणारे कृत्य आहे. पालिका प्रशासनाने या प्रकाराची दखल घेऊन नागरिकांना योग्य पद्धतीने मूर्ती विसर्जित करण्यासंदर्भात आवाहन करावे किंवा अशा प्रकारच्या मूर्ती विल्हेवाटीची योग्य व्यवस्था अर्थात शहरातील काही ठिकाणी विशेष संकलन केंद्रे उभारण्याची योजना आखली जावी. जेणे करून अशा प्रकारांना आळा बसू शकेल, असे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, देवतांच्या मूर्तींशी निगडित असलेली श्रद्धा जपताना सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीही नागरिकांनी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे नागरिकांनी जागरूक राहून अशा प्रकारांना विरोध करणे आणि योग्य पद्धतींचे पालन करायला हवे.

आजच्या काळात शहराचा वाढता विस्तार, जागेची मर्यादा आणि बदलती जीवनशैली यामुळे काहीवेळा अशा समस्या निर्माण होतात. पण त्यावर उपाय म्हणून अधिक जागरूकता, योग्य नियोजन आणि प्रशासनासोबत सहकार्य आवश्यक आहे. अनेक ठिकाणी मूर्ती विसर्जनासाठी विशेष व्यवस्था, पुनर्वापर केंद्रे किंवा पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जात आहेत. तसे अमळनेरमध्येही राबविले जाणे आवश्यक असले, तरी त्याचा लाभ घेताना स्वतःचीही जबाबदारी ओळखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्यच आहे.

या प्रसंगातून एक सकारात्मक संदेश पुढे येतो, की प्रशासन आणि नागरिक एकत्र आल्यास कोणतीही समस्या संवेदनशीलतेने सहजपणे सोडविता येते. मूर्तींची विल्हेवाट लावताना पालिकेने दाखविलेली तत्परता आणि जबाबदारी ही निश्चितच अनुकरणीय आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही आपल्या श्रद्धेचा सन्मान राखत, सामाजिक भान जपत आपली कर्तव्ये पार पाडली, तर अशा घटना नक्कीच टाळता येतील.

श्रद्धा ही केवळ वैयक्तिक भावना नसून ती समाजाच्या संस्कृतीची ओळख असते. देवतांच्या मूर्तींचा सन्मान राखणे म्हणजे आपल्या परंपरेचा आदर करणे होय. त्यामुळे प्रत्येकाने सजगतेने वागून, योग्य पद्धतींचा अवलंब करून आणि प्रशासनास सहकार्य करून एक सुसंस्कृत, संवेदनशील आणि आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध समाज घडविण्याचा प्रयत्न करावा, हीच काळाची गरज आहे.

# अमळनेर यात्रोत्सवासाठी पालिकेचे विशेष नियोजन

## भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह ४ पोलीस चौक्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : यंदाचा संतश्री सखाराम महाराज यात्रोत्सव अधिक उत्साहात, सुरक्षित आणि सुरळीतपणे पार पाडण्यासाठी येथील पालिकेकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. यात दुकानांची संख्या वाढविणे, चारही दिशांना पोलीस चौक्या उभारणे, तसेच सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे आणि हायमास्ट दिवे बसविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. माजी आमदार शिरीषदादा चौधरी आणि प.पू. संतश्री प्रसाद महाराज यांनी संयुक्त पाहणी करत यासंदर्भात पालिकेकडे विविध सूचना केल्या होत्या.

यासंदर्भात पालिकेने घेतलेल्या नियोजन बैठकीस नगराध्यक्ष डॉ. परीक्षित



बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, मुख्याधिकारी गणेश शिंदे, अनिल महाजन, सभापती कैलास पाटील, गुलाब पाटील, नगरसेवक श्रीराम चौधरी, पंकज चौधरी, मोहन सातपुते, सुयोग धनगर, बाळासाहेब संदानशीव, पंकज भोई, महेश देशमुख, प्रवीण पाठक यांच्यासह आरोग्य व पालिका कर्मचारी उपस्थित होते. यात्रेदरम्यान भाविकांची होणारी गर्दी व कोंडी टाळण्यासाठी १०० फूट रुंदीचे रस्ते ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी चार ठिकाणी पोलीस चौक्या उभारल्या जाणार आहेत. यासोबतच सर्व रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार असून, मध्यभागी ३६० अंशांचा विशेष कॅमेरा लावण्यात येणार आहे. तसेच चार ठिकाणी हायमास्ट दिव्यांमुळे संपूर्ण यात्रास्थळ प्रकाशमान ठेवले जाणार आहे. प्रत्येक दुकानदाराला जनित्र (जनरेटर) सक्तीचे करण्यात आले असून, मीना बाजार परिसरातही रस्ते रुंद करून पालिकेकडून स्वतंत्र जनित्राची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास अंधाराचा गैरफायदा घेऊन होणारे अनुचित प्रकार टाळता येणार आहेत.

यावर्षी यात्रेत १६० ते १७० दुकाने उभारली जाणार असून, नवीन पाळणे व विविध मनोरंजनात्मक साधनांचा त्यात समावेश असेल. यात्रोत्सवातील स्वच्छतेसाठी दररोज रात्री पालिका कर्मचाऱ्यांकडून विशेष साफसफाई मोहीम राबविली जाणार आहे. तसेच नदीपात्र स्वच्छ करून सपाटीकरण करण्यात येणार असून, भाविकांना तेथे बसून भोजन करता येईल, अशी सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. रथमार्गाचे डांबरीकरणही करण्यात येणार आहे. एकूणच यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि भाविकांना सुरक्षित व आनंददायी वातावरण मिळावे, यासाठी पालिकेकडून सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत असल्याचे पालिकेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

# शेतीच्या कामांसाठी सालगडी मिळेना

## शेतमालकाला शेती परवडेना; वार्षिक पॅकेज दीड लाखावर, शेतकऱ्यांपुढे नवे संकट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नैसर्गिक संकटांचा वाढता मारा, शेतीमालाला मिळणारे अल्प भाव आणि वाढता उत्पादन खर्च, यामुळे शेती आधीच संकटात सापडला असताना आता शेतकऱ्यांपुढे सालगड्याच्या टंचाईचे नवे संकट उभे ठाकले आहे. शेतात काम करण्यासाठी सालदार अर्थात सालगडी शोधूनही मिळत नसल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. एखादा गडी मिळालाच तर तो वर्षाला तब्बल एक ते दीड लाखाचे पॅकेज मागत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे.

गुढीपाडव्यापासून ते अक्षय तृतीया या काळात शेतकरी वर्षभरासाठी सालगड्याचे पॅकेज ठरवून त्याच्याशी करार करतात. मात्र, सालगड्यांची कमतरता प्रकर्षाने जाणवत आहे. आता शोधूनही मिळत नसल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे सांभाळणे अवघड झाले आहे.

(पान २ वर...)



> अलीकडच्या काळात शासनाच्या वतीने अनुदानित योजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे कामाची कुणालाच गरज उरली नाही. शेतात काम करण्यासाठी मजूर आवश्यक असले तरी शेतकऱ्यांवर शोधाशोध करण्याची वेळ येत आहे. मजूर मिळत नसल्याने मजुरीही वाढवून द्यावी लागत असल्याने शेतकरी संकटात आहे.
>
> **– विजय पाटील, शेतकरी, अमळनेर**

> अपुऱ्या पावसामुळे या परिसरात बागायती क्षेत्राचे कोरडवाहू क्षेत्र झाल्यामुळे शेतकऱ्यांना सालगडी ठेवणेही कठीण झाले आहे. त्यात खते व बियाण्याचा खर्च वाढत चालला आहे. त्यातही घरची मुले शेती कसण्यासाठी पुढे येत नाहीत. यामुळे येणाऱ्या काळात शेती कशी करावी, असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना पडला आहे.
>
> **– सचिन धनगर, शेतकरी, शिरूड**

**भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ**

# जनजागर रथाद्वारे अनुभवली भूमिमातेची महती

## ध्वनिक्षेपकावरून दिल्या जाणाऱ्या माहितीबाबतही शेतकऱ्यांत समाधान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जगाच्या पाठीवर आपला भारत हा एकमेव देश कृषिप्रधान आहे. मात्र, सद्यःस्थितीत देशातील शेती, शेतमजूर व कृषी उत्पन्न आदींची परिस्थिती बिकट बनत चालली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वाढता वापर. या पार्श्वभूमीवर शेतजमिनीचा पोत सुधारावा आणि शेती सुजलाम्-सुफलाम् होऊन पुनर्वैभव प्राप्त व्हावे, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवत अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ष प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर आणि भूमिमातेच्या जन्मदिनी केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंहजी चौहान यांच्यासह विविध मंत्री महोदय, महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे पदाधिकारी आणि शेतकऱ्यांच्या साक्षीने 'भूमी सुपोषण अभियान' या राष्ट्रीय चळवळ जनजागराला शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर हे अभियान जनजागर रथाच्या माध्यमातून आता गावागावांत पोहोचविले जात आहे.

बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी तालुक्यातील कुऱ्हे खुर्द, कुऱ्हे बुद्रुक, म्हसले, कंडारी, टाकरखेडा, औरंगपूर, दहिवद, सोनखेडी आणि निमझरी या गावांना जनजागर रथाने भेट दिली. याप्रसंगी सर्वच गावांतील ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून जनजागर रथाचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. जनजागर रथातून ध्वनिक्षेपकाद्वारे दिली जाणारी माहिती अनुभवत आणि भूमी सुपोषण अभियानाचा मुख्य उद्देश, कार्य आणि त्याची भविष्यातील व्याप्ती लक्षात घेतल्यानंतर त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांना भूमी सुपोषण नेमके काय आहे? याची सविस्तर माहिती समजावून सांगितली तसेच ही माहिती आपल्या गावासह इतरांपर्यंतही ती पोहोचावी, यासाठी छापलेले पत्रकही त्यांना वितरीत करण्यात आले. यावर संबंधित शेतकऱ्यांनी आम्हीही या कार्यात सहभागी होऊन यापुढे सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्याला प्रारंभ देऊ, अशी ग्वाही देत इतरांपर्यंतही हा संदेश पोहोचवू, अशी ग्वाही दिली. या अभियानाच्या जनजागराची व्याप्ती अधिकाधिक पोहोचावी, यासाठी नुकताच मासिक जनजागर सांगता सोहळाही श्री मंगळग्रह मंदिरात अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर संपन्न झाला. यातून भूमिमातेचे आपल्यावरील असलेल्या विविध उपकारांचीही जाणीवही याप्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना झाल्याने या अभियानाचा जागर आता गावागावांत पोहोचू लागला आहे.




*अमळनेर : भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ जनजागराच्या रथाचे बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी उत्स्फूर्त स्वागत करून या अभियानाचे महत्त्व समजावून घेताना ग्रामस्थ व शेतकरी.*

# सोने, चांदीचे दर घसरले

## सुवर्ण बाजारपेठेत ग्राहकांना दिलासा !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील सुवर्ण बाजारपेठेत मंगळवारी सोने, चांदी दरात वाढ झाल्याने खळबळ उडाली होती. मात्र, बुधवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर पुन्हा दोन्ही धातुंचे दर रिव्हर्स झाल्याने ग्राहकांना काही अंशी दिलासा मिळाला. जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत मंगळवारी सोने, चांदी दरात वाढ झाल्याने खळबळ उडाली होती. मात्र, बुधवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर पुन्हा दोन्ही धातुंचे दर रिव्हर्स झाल्याने ग्राहकांना काहीअंशी दिलासा मिळाला. अर्थात, आज सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली असली तरी त्याकडे तात्पुरत्या स्वरूपातील बदल म्हणून पाहिले जात आहे.

जागतिक आर्थिक परिस्थिती सध्या अस्थिर असल्याने त्याचा थेट परिणाम मौल्यवान धातुंच्या किमतींवर होत आहे. विशेषतः अमेरिकन डॉलरची मजबुती, आंतरराष्ट्रीय बाजारात व्याजदरांत झालेला बदल आणि जागतिक मंदीच्या शक्यता, यामुळे सोन्याच्या किमतींवर दबाव निर्माण झाला आहे. डॉलर मजबूत झाला की इतर चलनांमध्ये सोने महाग वाटू लागते. त्यामुळे त्याची मागणी कमी होते आणि दर घसरतात.



**सोन्याचे दर**

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत सोमवारी ७२१ रुपयांची घट झाल्याने २४ कॅरेट सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १,५६,९७२ रुपयांपर्यंत घसरले होते. तर मंगळवारी ६१८ रुपयांची वाढ झाल्याने दर तीन टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १,५७,५९० रुपयांपर्यंत पोहचले होते. बुधवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर मात्र २०६ रुपयांची घट नोंदवली गेली. त्यामुळे सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १,५७,३८४ रुपयांपर्यंत खाली आले.

**चांदीचे दर**

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत सोमवारी ७२१० रुपयांची घट झाल्याने चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो २,६०,५९० रुपयांपर्यंत घसरले होते. तर मंगळवारी १०३० रुपयांची वाढ झाल्याने दर जीएसटीसह प्रतिकिलो २,६१,६२० रुपयांपर्यंत पोहचले होते. बुधवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर मात्र १०३० रुपयांची घट नोंदवली गेली. त्यामुळे चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो २,६०,५९० रुपयांपर्यंत खाली आले.

## संपादकीय

# कागदी घोड्यांपुढे मराठीचे नृत्य...

देशाच्या नव्या शिक्षण धोरणातील तरतुदींचा राज्य सरकारने चुकीचा अर्थ काढल्यामुळे त्रिभाषा सूत्राचा आधार घेऊन हिंदीची सक्ती लादण्यास सर्व स्तरांतून प्रखर विरोध झाला. मराठी भाषक व राजकीय पक्षांच्या आंदोलनांनी महाराष्ट्र ढवळून निघाला. वारंवार इशारे देऊनही मराठी न शिकवणाऱ्या शाळांच्या विरोधात आता राज्य सरकारने दंड आणि मान्यता रद्द करण्याचे हत्यार उपसले आहे. रिक्षा आणि टॅक्सीचालकांना मराठीत बोलण्याच्या सक्तीपाठोपाठ आता मराठी भाषा विभागाने याबाबतचा आदेश काढला आहे. वास्तविक २०२० मध्येच राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व बोर्डांच्या शाळांमधील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकविण्याची सक्ती करण्यात आली होती; मात्र, अनेकदा आदेश–इशारे दिल्यानंतरही विशेषतः खासगी इंग्रजी शाळा आणि 'सीबीएसई' व 'आयसीएसई' बोर्डाच्या शाळांकडून त्याचे पालन होत नसल्याचे उघड झाल्याने सरकारने कडक पवित्रा घेतलेला दिसतो. मराठीच्या अध्यापन–अध्ययनासाठी वेळप्रसंगी कठोर भूमिका घेणे स्वागतार्हच आहे; मात्र त्यामागील कारणांचा विचार केल्यास केवळ दंडात्मक कारवाई करून परिस्थितीत सुधारणा होणार का, याचे उत्तर सरळसोपे नाही, हे लक्षात येते. कायदे–नियमांच्या अंमलबजावणीची कमकुवत यंत्रणा आणि शाळांचे दुर्लक्ष यांबरोबरच पालकांची याबाबतची अनास्थाही याला कारणीभूत आहे. त्यामुळेच शाळांमध्ये मराठी शिकणे–शिकवणे सुलभ व्हावे, यासाठी सर्वच घटकांनी मिळून व्यापक उपाय योजणे गरजेचे आहे.

हिंदी सक्तीच्या विरोधात मराठीजनांच्या भावना तीव्रपणे प्रकट झाल्या, तेवढ्या प्रमाणात मराठी शिकवण्याच्या सक्तीसाठी सर्वदूर आग्रह दिसून येत नाही, हे दुर्दैवी वास्तव आहे. त्यामुळेच सरकारने मराठीसक्ती केल्यानंतर सहा वर्षांनीही त्याची रडतखडत अंमलबजावणी होताना दिसते. 'शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम २०२०' लागू झाल्यानंतरही खासगी इंग्रजी शाळा आणि राज्य बोर्ड वगळता अन्य बोर्डांच्या शाळांनी तो गांभीर्याने घेतला नाही. अनेक शाळांमध्ये वेळापत्रकातून मराठीच्या तासिकाही हरवलेल्या दिसतात; तर काही शाळांमध्ये विद्यार्थी मराठीत बोलल्यास शिक्षा होत असल्याचीही संतापजनक उदाहरणे आहेत. या पार्श्वभूमीवर दोन वर्षांपूर्वी सरकारने त्यांना असाच इशारा दिला होता; मात्र या शाळांनी त्यालाही केराची टोपली दाखवली. आता याच्या अंमलबजावणीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकांमार्फत तपासणी करून एक लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि त्यानंतर शाळांची मान्यता काढून घेण्याचा आदेश काढण्यात आला आहे. आजवर कागदी घोडे नाचवणाऱ्या सरकारने घेतलेल्या या कडक भूमिकेचे स्वागतच केले पाहिजे; मात्र प्रश्न सुटण्यासाठी केवळ अशा कारवायांचा दबाव पुरेसा आहे का, याचाही विचार करावा लागेल. 'सीबीएसई' आणि 'आयसीएसई' आदी बोर्डांना संलग्न असलेल्या शाळा 'ना हरकत प्रमाणपत्र' वगळता मान्यतेसाठी राज्य सरकारच्या अधिकारक्षेत्रात येत नाहीत; त्यामुळे त्यांची मान्यता काढून घेणे प्रशासकीयदृष्ट्या शक्य आहे का, याबाबत जाणकारांना शंका आहे.

विद्यार्थ्यांना मराठीचे अध्यापन करण्यात या शाळांपुढील अडचणींमधूनही मार्ग काढणे आवश्यक आहे. अन्य बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी शिक्षणाला गुण किंवा श्रेणीचा पुरेसा आधार नाही, त्यामुळे थातुरमातुर स्वरूपात, जमेल तसे आणि जमेल तेवढ्या मराठी अध्यापनाचा उपचार पार पाडला जातो. अनेक शाळांमध्ये मराठीच्या अध्यापनासाठी पुरेसे पात्र शिक्षक; पुस्तके–शैक्षणिक साधनेही नाहीत. अशा समस्यांचे निराकरण प्रथम केले पाहिजे. शाळांचे दुर्लक्ष आणि अंमलबजावणीतील त्रुटींबरोबरच मराठी शिक्षणाबाबत पालकांची अनास्था हाही पेच आहे. मराठी भाषेच्या शिक्षणाचा आग्रह रास्त आहे; परंतु इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढत असल्याच्या आजच्या काळात आपल्या मुलांना इंग्रजीतून शिकविण्याकडे पालकांचा कल अधिक आहे, हे नाकारता येणार नाही आणि त्याबद्दल त्यांना दोषीही ठरविता येणार नाही. एकीकडे जवळपास मोफत शिक्षण देणाऱ्या, गणवेश, वह्या–पुस्तके आणि पोषण आहार अशा सुविधा देणाऱ्या मराठी माध्यमांच्या शाळांतून गेल्या दहा वर्षांत सहा लाख विद्यार्थी कमी होऊन शेकडो शाळा बंद पडत असताना खासगी इंग्रजी शाळांची भरभराट होण्याचे तेच कारण आहे. या शाळांमध्ये मराठी शिकवण्यासाठी पालकांकडून दबाव येताना दिसत नाही. 'इंग्रजीतून शिकल्याशिवाय भविष्यात आपल्या पाल्यांचा निभाव लागणार नाही,' ही भीती दूर होत नाही, तोवर चित्र बदलणार नाही. त्यासाठी मराठी शाळांची गुणवत्ता सुधारणे आणि जनजागृती–पुरस्कार–प्रोत्साहन देऊन मराठी विषय आणि माध्यमांमधील शिक्षणाविषयी आकर्षण आणि विश्वास निर्माण केला, तरच मराठीची गळचेपी थांबेल.

पान १ वरून...

## शेतीच्या कामांसाठी सालगडी मिळेना

गेल्या तीन–चार वर्षांपासून खरीप व रब्बी हंगामात अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि दुष्काळ अशा नैसर्गिक संकटांचा फटका या भागाला बसत आहे.

पेट्रोल–डिझेलची वाढ झाल्यामुळे आधुनिक शेती महागडी झालेली आहे. त्यामुळे आता पारंपरिक शेतकरी वळावे लागेल. पिकांच्या उत्पादनात घट झाली असून, बाजारपेठेतही समाधानकारक भाव मिळत नाहीत. परिणामी, लागवड खर्चही वसूल होत नसल्याने शेती तोट्याची ठरत आहे. अपुऱ्या पावसामुळे परिसरातील बागायती क्षेत्र कोरडवाहू झाले आहे. त्यामुळे उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांना सालगडी ठेवणेही दिवसेंदिवस कठीण होत आहे. नैसर्गिक संकटांचा सामना करताना शेतकरी मेटाकुटीस आला आहे. पिकांचे उत्पादन घटत आहे, तर बाजारपेठेत भावही मिळत नाहीत. अशा परिस्थितीत शेती कशी करावी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# 'वाचन हेच खरे शिक्षण'



## जागतिक पुस्तक दिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जागतिक पुस्तक दिन हा वाचनसंस्कृतीचा उत्सव मानला जातो. दरवर्षी २३ एप्रिल रोजी साजरा होणारा हा दिवस पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी, वाचनाची आवड वाढविण्यासाठी आणि लेखकांना सन्मान देण्यासाठी जगभरात साजरा केला जातो. आजच्या डिजिटल युगातही पुस्तकांचे स्थान अढळ आहे, हे या दिवसाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

पुस्तके ही केवळ ज्ञानस्रोत नसून ती माणसाच्या विचारविश्वाला दिशा देणारी शक्ती आहेत. इतिहास, विज्ञान, साहित्य, तत्त्वज्ञान, कला अशा विविध क्षेत्रांतील ज्ञान पुस्तकांमधूनच पिढ्यानपिढ्या हस्तांतरित झाले आहे. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील बदलाची सुरुवात अनेकदा एका चांगल्या पुस्तकापासून होते. त्यामुळे 'वाचन हेच खरे शिक्षण' असे म्हटले जाते.

जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यामागे एक विशेष ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. २३ एप्रिल हा दिवस अनेक महान साहित्यिकांच्या स्मृतिदिनाशी जोडलेला आहे. त्यामुळे युनेस्कोने १९९५ मध्ये हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. या निमित्ताने विविध देशांमध्ये पुस्तक प्रदर्शन, लेखक–भेटी, वाचन स्पर्धा, ग्रंथदालन उपक्रम अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

आजच्या काळात मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे वाचनाची सवय काही प्रमाणात कमी होताना दिसते. माहिती सहज उपलब्ध होत असली तरी सखोल वाचनाची गोडी कमी होत आहे. यामुळे एकाग्रता, कल्पनाशक्ती आणि विश्लेषण क्षमता यांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळेच पुस्तकांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. स्क्रीनवरील झटपट माहितीपेक्षा पुस्तकातील सखोल ज्ञान अधिक प्रभावी आणि टिकाऊ असते.

वाचनामुळे भाषिक कौशल्ये सुधारतात, विचारशक्ती वाढते आणि व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते. लहान मुलांमध्ये वाचनाची सवय लावणे अत्यंत गरजेचे आहे. पालक आणि शिक्षकांनी मुलांना गोष्टींची पुस्तके, प्रेरणादायी साहित्य आणि ज्ञानवर्धक ग्रंथ वाचण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. यामुळे त्यांच्या बौद्धिक आणि भावनिक विकासाला चालना मिळते.

ग्रंथालये ही वाचनसंस्कृतीची केंद्रे मानली जातात. गावागावांत आणि शहरांमध्ये ग्रंथालयांची संख्या वाढवणे, त्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि लोकांना त्यांचा उपयोग करण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक भाषांतील साहित्याला प्रोत्साहन देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक पुस्तक दिन हा केवळ एक औपचारिक उत्सव नसून तो वाचनाचा आनंद पुन्हा अनुभवण्याची संधी आहे. या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक हातात घ्यावे, काही पानांचे वाचन करावे आणि ज्ञानाच्या या अनमोल स्रोताशी नाते दृढ करावे.

शेवटी, पुस्तक हे मानवाचे सर्वात विश्वासू मित्र आहे, जे कधीही साथ सोडत नाही. बदलत्या काळातही पुस्तकांचे महत्त्व कायम आहे आणि राहील. चला, जागतिक पुस्तक दिनानिमित्त वाचनाची सवय जोपासूया आणि ज्ञानसमृद्ध समाज घडवण्याचा संकल्प करूया.

# पातोंड्यातील शाळेत बोगस भरती

## नाशिक शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर तक्रारदारांचे उपोषण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नाशिक विभागात शालार्थ आयडी घोटाळ्यामुळे आधीच खळबळ उडाली असताना, जिल्ह्यातील पातोंडा (ता. अमळनेर) येथील श्री दत्त विद्या मंदिर व उच्च माध्यमिक विद्यालयात काही कर्मचाऱ्यांची बोगस भरती झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.





नाशिक विभागात शालार्थ आयडी घोटाळ्यामुळे आधीच खळबळ उडाली असताना, जिल्ह्यातील पातोंडा (ता. अमळनेर) येथील श्री दत्त विद्या मंदिर व उच्च माध्यमिक विद्यालयात काही कर्मचाऱ्यांची बोगस भरती झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी दोषींवर तत्काळ गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी बुधवारपासून नाशिक येथील शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयासमोर तक्रारदारांनी उपोषणाला सुरुवात केली आहे.तक्रारदार भूषण राजेंद्र देवरे, राजेंद्र रमेश यादव यांनी निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पातोंडा येथील शाळेत काही व्यक्तींनी शासनाची फसवणूक करत बेकायदेशीर मार्गाने शिक्षक व शिपाई पदांवर नियुक्त्या मिळवल्या. त्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आला असून, शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप आहे.

### मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारीही दोषी?

संबंधित बोगस कर्मचाऱ्यांचे यूएएन क्रमांक आणि पीएफ खात्यांची चौकशी करून त्यांच्या सेवेशी संबंधित नोंदींची पडताळणी करावी. तसेच, बोगस शालार्थ आयडीच्या माध्यमातून केलेल्या नोंदी तात्काळ रद्द करून संबंधितांची नावे शासकीय प्रणालीतून वगळावीत. या कर्मचाऱ्यांनी शासनाकडून घेतलेले वेतन व इतर आर्थिक लाभ व्याजासह परत वसूल करावेत, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, काही कर्मचारी खाजगी संस्थांमध्ये कार्यरत असतानाच शासन अनुदानित शाळेत कार्यरत असल्याचे दाखविण्यात आल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणाबाबत तक्रारदारांनी यापूर्वी नाशिक विभागीय मंडळाचे शिक्षण उपसंचालक कार्यालय तसेच पुणे येथील शिक्षण आयुक्त कार्यालयात येथे लेखी तक्रारी सादर केल्या होत्या. मात्र, अनेक वेळा पाठपुरावा करूनही संबंधितांवर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

या प्रकरणात केवळ कर्मचारीच नव्हे तर बनावट कागदपत्रांच्या आधारे वेतन मंजूर करणारे शिक्षणाधिकारी, तसेच संपूर्ण प्रक्रियेत सहभागी असलेले मुख्याध्यापक व लिपिक यांच्यावरही जबाबदारी निश्चित करून भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हे दाखल करावे. याशिवाय, संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्याची मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.दोषींना मकोका लावण्याची मागणीतक्रारदारांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागवलेली माहिती वेळेत व संपूर्ण स्वरूपात उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी केली आहे. तसेच, या प्रकरणातील गैरव्यवहाराचे स्वरूप गंभीर असल्याने आवश्यक असल्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गतही कारवाई करण्याचा विचार करावा, असे निवेदनात म्हटले आहे. दोषींवर कारवाई होत नाही तोपर्यंत उपोषण सुरु राहणार असल्याचेही तक्रारदार भूषण देवरे आणि राजेंद्र यादव यांनी नमूद केले आहे. बुधवारपासून नाशिकमध्ये नाशिक येथील शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयासमोर सुरु करण्यात आलेल्या उपोषणात नितीन पारधी, अनिल पाटील, रवींद्र बिरारी, शरद शिंदे, विकी पाटील, शरद शिंदे, गोकुळ बिरारी हे देखील सहभागी झाले आहेत. दरम्यान, सहाय्यक शिक्षण संचालक मंदाकिनी देवकर यांनी उपोषणकर्त्यांचे निवेदन स्वीकारुन त्यांच्याशी चर्चा केली.



# अंगावर काटा कसा येतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अंगावर काटा येणे ही एक अनैच्छिक क्रिया आहे, जी थंडी, भीती, आनंद किंवा तीव्र भावनांमुळे उद्भवते.

### स्नायू

आपल्या त्वचेखाली 'अॅरेक्टर पिली' नावाचे अत्यंत लहान स्नायू असतात, मेंदूच्या संदेशानुसार ते चालतात.

### थंडी

जेव्हा आपल्याला भीती वाटते किंवा थंडी वाजते तेव्हा मेंदूकडून या स्नायूंना आकुंचन पावावे, असा संदेश मिळतो.

### त्वचेवरील केस

हे स्नायू आकुंचन पावले, की त्वचेवरील केसांच्या मुळांना ते वर खेचतात, ज्यामुळे केस उभे राहतात.

### केस उभे राहणे

शरीराचे केस उभे राहिल्यामुळे त्वचेवर छोटे–छोटे उंचवटे दिसू लागतात, यालाच आपण 'अंगावर काटा येणे' म्हणतो.

### थंडीची जाणीव

जेव्हा ही भावना किंवा थंडीची जाणीव कमी होते, तेव्हा हे स्नायू पुन्हा शिथिल होतात.

### केसांची मुळे

स्नायू शिथिल झाल्यामुळे वर खेचलेली केसांची मुळे पुन्हा आपल्या मूळ जागी परततात.

### छोटे उंचवटे

यामुळे त्वचेवर आलेले ते छोटे उंचवटे दबले जातात आणि काटा नाहीसा होतो.

### उष्णता

वैज्ञानिकदृष्ट्या थंडीमध्ये शरीराची उष्णता टिकवून ठेवण्यासाठी ही एक प्रकारची संरक्षणात्मक पद्धत आहे.

### स्नायू सैल होतात


थोडक्यात अंगावरचा काटा कुठेही जात नाही, तर तो निर्माण करणारे स्नायू सैल झाल्यामुळे त्वचा पुन्हा सपाट दिसते.

# आगामी काळ अविवाहितेचे युग ठरणार?

## आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणानुसार पुढील सहा वर्षांत जगातील ४५ टक्के मुली राहू शकतील अविवाहित!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एका आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणानुसार पुढील सहा वर्षांत जगातील जवळपास ४५ टक्के मुली अविवाहित राहू शकणार आहेत. त्याची नेमकी काय कारणे आहेत. ते जाणून घेऊया.



### सर्वेक्षणातील प्रमुख कारणे

१) सद्यःस्थितीतील मुली उच्च शिक्षण घेत आहेत आणि करिअरला प्राधान्य देत आहेत.
२) त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असून, कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाहीत.
३) त्यांना स्वातंत्र्य प्रिय आहे. त्या स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायला इच्छुक आहेत.
४) विवाह, मातृत्व आणि कौटुंबिक बंधने ही त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरतात, असे त्यांना वाटते.
५) ही प्रवृत्ती कायम राहिल्यास पारंपरिक कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक रचना ढासळू शकते.
६) लोकसंख्या घट, अविवाहित मुलांची संख्या वाढ आणि वृद्धावस्थेत एकटेपणाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.
७) शेवटी प्रश्न उरतो प्रगती, पद आणि पैसा यांचा उपयोग काय, जर आयुष्याच्या शेवटी साथ देणारा कोणीच नसेल तर?

अनेक पालक मुलींसाठी संबंध शोधत आहेत. पण मुलींनाच विवाहात रस नसल्यामुळे प्रत्येक प्रस्ताव नाकारला जात आहे. समाजातील मोठ्या घटकाला या बदलाची गंभीरता अजून पाहिजे तशी समजलेली नाही. यामुळे वेळेवर जागे होणे आवश्यक आहे. मुलींच्या विवाहासाठी योग्य वय २३ ते २६ वर्षे मानले जाते. शक्य असल्यास त्याहीपेक्षा लवकर. यासाठी सामूहिक पातळीवर जागरूकता आणि प्रयत्न गरजेचे आहेत. हा विषय कोणाच्या विरोधात नसून, भविष्यातील स्थैर्य आणि संतुलनाच्या चिंतेतून मांडला आहे. समाज, कुटुंब आणि वैयक्तिक जीवन यांचा समतोल राखणे हीच खरी प्रगती आहे.

### भविष्यातील गंभीर समस्या

- जेव्हा मुलांचे लग्न २० व्या वर्षी होत होते तेव्हा एका शतकात ५ पिढ्या असत.
- जेव्हा लग्न २५ व्या वर्षी होत होते तेव्हा ४ पिढ्या असत.
- आता ३० व्या वर्षी लग्न होत असल्याने एका शतकात फक्त ३ पिढ्या उरतात.
- मुली ३० ते ३५ वर्षांपर्यंत अविवाहित आहेत.
- मुलगे ३५ वर्षांनंतरही अविवाहित आहेत.
- उशिरा लग्न आणि मग घटस्फोट.

### तुटणारी कुटुंबे

- दुःखी आई–वडील
- एकटे पालक
- पूर्ण पिढी रिकामटेकडेपण अनुभवते.

### याला 'सुशिक्षित समाज' म्हणायचे का? की 'स्वतःचे नुकसान करणारा समाज'?

जर ५० जोडप्यांमध्ये फक्त एकच मूल असेल, तर पुढील पिढीत मुले खूपच कमी राहतील. असेच चालू राहिले, तर तिसरी पिढी जवळजवळ नाहीशी होईल. गल्ल्या, वाड्या रिकाम्या होत आहेत. लोक रस्त्यावर जास्त वेळ घालवत आहेत. गावे हळूहळू संपत आहेत. शहरांमध्ये उंच इमारती आहेत, पण संयुक्त कुटुंब व्यवस्था संपत चालली आहे. नव्या सुना 'फक्त एकच मूल' हवे असे म्हणतात.

सत्य हे आहे की आता मुले प्रेमाचे प्रतीक राहिली नाहीत. मुलांना जन्म देणे ही एक जबाबदारी किंवा मजबुरी झाली आहे. सर्वांत मोठी चूक मुलीच्या वडिलांची आहे. जे स्वतः २०–२२ व्या वर्षी लग्न करून कुटुंब उभे केले तेच आता मुलीचे लग्न ३० पर्यंत न लावता अभिमान बाळगतात.

### परिणाम?

- मुलगे–मुली नैराश्यात जात आहेत.
- योग्य वेळी ना लग्न होत आहे, ना योग्य नोकरी मिळत आहे.
- समाज हळूहळू संपत चालला आहे.
- त्यामुळे मुले समाजापेक्षा एकटे राहणे पसंत करतात. म्हणजेच लहान (न्यूक्लिअर) कुटुंब.
- उशिरा लग्न, उशिरा मूल आणि मग एकाच मुलानंतर विविध कारणे ही गोष्ट आता सामान्य झाली आहे.
- हजारो तरुण मुलगे–मुली वय वाढल्यामुळे अविवाहित राहतात आणि समाजातील सुजाण लोक शांत आहेत.
- विवाह, कुटुंब, मुले हे सर्व ओझे वाटू लागले आहे.
- विवाह हा फक्त बंधन नाही तर तो कुटुंब आणि समाजाचा पाया आहे.
- संस्कृती, परंपरा आणि पिढ्या पुढे नेण्याचा मार्ग आहे.
- आता समजून घेण्याची वेळ आली आहे.
- मुलांना अतिस्वातंत्र्य देऊन आपण त्यांची समज कमी केली आहे.
- लग्न पुढे ढकलले गेले. जेव्हा झाले तेव्हा उशीर झाला होता आणि मग पुन्हा तेच एकटेपण.

### विवाहाचे योग्य वय

- मुलांसाठी २५ वर्षांपूर्वी
- मुलींसाठी २० वर्षांपूर्वी

नाहीतर इतिहास लिहील, की 'तो समाज ज्याने स्वतःच स्वतःला संपवले.' म्हणून विचार करा आणि शहाणपणाने वागा. आपल्या मुलांचे लग्न वेळेवर करा. कारण कुटुंब नसेल,तर समाज टिकणार नाही.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# कल्पना सुचली, कचऱ्यामुळे बदलले आयुष्य!

## आज महातो करीत आहेत कोट्यवधींची उलाढाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

रांची येथील रहिवासी असलेले सतीश महातो शेती करायचे. याच काळात त्यांच्या लक्षात आले, की मक्याची पाने, हिरवे गवत, बाजरीचा कचरा किंवा कापणीनंतर जे काही उरते तो वाया घालवला जातो किंवा कचऱ्यात फेकला जातो. त्यांनी या संसाधनांचा हुशारीने उपयोग केला आणि आपली कंपनी स्थापन केली.

हीच कल्पना मनात ठेवून सतीश यांनी २०१६ मध्ये फिडको ॲग्रोकार्टची स्थापना केली. हे व्यासपीठ केवळ शेतकऱ्यांना चांगला भावच देत नाही, तर शेतीतील कचऱ्याचे उत्पन्नाच्या स्रोतात रूपांतर करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवीन मार्गही उपलब्ध करून देते. ते म्हणतात, की आज आमची वार्षिक उलाढाल अंदाजे एक कोटी रुपये आहे.

सतीश महातोंची सर्वांत मोठी ताकद म्हणजे त्यांचे पीक अवशेष व्यवस्थापनावर असलेले लक्ष. त्यांची स्टार्टअप कंपनी दरवर्षी १५०० टन शेतीतील कचऱ्याचे व्यवस्थापन करते. या कचऱ्याचा उपयोग जनावरांचे खाद्य, पॅकेजिंग साहित्य आणि औषधनिर्माण उद्योगातही केला जातो. स्वीट कॉर्न फायबरचा वापर औषधनिर्माण उद्योगात केला जातो, आणि मक्याच्या



कणसांचा वापर पशुखाद्य आणि पॅकेजिंगमध्ये केला जातो.

आयआयटीटीएम भुवनेश्वर येथून बॅचलर ऑफ टुरिझम मॅनेजमेंट आणि लॉजिस्टिक्समध्ये एमबीए करत असताना सतीशला ही कल्पना सुचली. सतीश सांगतो, "मी लहानपणापासूनच एक हुशार विद्यार्थी होतो. मी सरकारी शाळेत शिकलो, तरीही मला शिकण्यासाठी सुमारे १० किलोमीटर नदी पार करावी लागत असे. माझे आई-वडील अशिक्षित आहेत. पण मला माहित होते की शिक्षणाच्या माध्यमातून मी माझी दिशा आणि माझी परिस्थिती दोन्ही बदलू शकेन.


सतीश सांगतो, की आज अंदाजे ६,००० शेतकरी आमच्यासोबत थेट सहभागी आहेत. आमचे अनेक कर्मचारी पूर्णवेळ काम करतात आणि इतकेच नाही तर ते सुमारे १५,००० ते १८,००० रुपये इतका चांगला पगारही कमावतात. हे सर्व स्थानिक गावकरी आहेत, ज्यांना येथे रोजगाराच्या संधीही मिळत आहेत. अशा प्रकारे सतीशच्या कंपनीमुळे सर्वांना फायदा होतो. कचऱ्याची कार्यक्षमतेने विल्हेवाट लावली जात आहे, त्याला चांगले उत्पन्न मिळत आहे आणि लोकांना रोजगारही मिळत आहे.

# जगभरातील रंगभूमीसह साहित्यावर प्रभाव टाकणारे : विल्यम शेक्सपियर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्मृतिदिन विशेष

जगाच्या साहित्यविश्वात अजरामर ठसा उमटवणारे महान नाटककार आणि कवी विल्यम शेक्सपियर यांचा स्मृतिदिन २३ एप्रिल रोजी पाळला जातो. इंग्रजी साहित्यातील सर्वात प्रभावशाली लेखक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेक्सपियर यांनी आपल्या लेखनातून मानवी स्वभाव, भावना आणि समाजरचनेचे अत्यंत सूक्ष्म आणि प्रभावी चित्रण केले.



इ.स. १५६४ मध्ये इंग्लंडमधील Stratford-upon-Avon येथे जन्मलेले शेक्सपियर यांनी आपल्या आयुष्यात सुमारे ३९ नाटके, १५४ सॉनेट्स आणि अनेक काव्यरचना लिहिल्या. त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये म्हणजे भाषेची ताकद, कथानकातील गुंतागुंत आणि व्यक्तिरेखांची सजीवता. त्यांनी मानवी जीवनातील प्रेम, द्वेष, लोभ, सत्ता, विश्वासघात अशा विविध भावनांचा खोलवर अभ्यास करून त्यांना कलात्मक रूप दिले.

त्यांच्या काही अजरामर नाटकांमध्ये Hamlet, Macbeth, Othello आणि Romeo and Juliet यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. या नाटकांनी केवळ इंग्रजी साहित्यातच नव्हे, तर जगभरातील रंगभूमी आणि साहित्यावर खोलवर प्रभाव टाकला आहे. 'To be, or not to be' सारख्या त्यांच्या ओळी आजही लोकांच्या ओठांवर कायम आहेत.

शेक्सपियर यांच्या साहित्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सार्वकालिकता. त्यांच्या कथा आणि व्यक्तिरेखा आजही तितक्याच सुसंगत वाटतात, कारण त्यांनी मानवी जीवनातील मूलभूत सत्ये मांडली आहेत. त्यामुळेच त्यांच्या साहित्याचे अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले असून जगभरात त्यांच्या नाटकांचे प्रयोग केले जातात.

शेक्सपियर यांनी इंग्रजी भाषेला मोठा ठेवा दिला आहे. त्यांनी अनेक नवे शब्द आणि वाक्प्रचार निर्माण केले, जे आजही इंग्रजी भाषेत वापरले जातात. त्यांच्या लेखनामुळे इंग्रजी भाषेची अभिव्यक्ती अधिक समृद्ध झाली.

२३ एप्रिल हा दिवस केवळ त्यांचा स्मृतिदिन नाही, तर जागतिक पुस्तक दिन म्हणूनही साजरा केला जातो. त्यामुळे या दिवशी साहित्यप्रेमींना शेक्सपियर यांच्या कार्याचा पुनर्विचार करण्याची आणि वाचनाची प्रेरणा घेण्याची संधी मिळते.

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रधान युगातही शेक्सपियर यांचे साहित्य तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांच्या लेखनातून मिळणारे जीवनाचे धडे, नैतिक मूल्ये आणि मानवी स्वभावाचे दर्शन आजही तितकेच उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांपासून ते अभ्यासकांपर्यंत सर्वांसाठी त्यांचे साहित्य मार्गदर्शक ठरते.

शेवटी विल्यम शेक्सपियर हे केवळ एक लेखक नव्हते, तर ते मानवी मनाचे सूक्ष्म निरीक्षक होते. त्यांच्या साहित्यामुळे जग समजून घेण्याची दृष्टी मिळते.

# सर्जनशीलतेतून भारतीय सिनेमाला नवी दिशा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्मृतिदिन विशेष

भारतीय चित्रपटसृष्टीला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून देणारे महान दिग्दर्शक, लेखक आणि कलावंत सत्यजीत रे यांचा स्मृतिदिन २३ एप्रिल रोजी साजरा केला जातो. त्यांच्या सर्जनशीलतेने भारतीय सिनेमाला एक नवी दिशा दिली आणि वास्तववादी चित्रपटांची परंपरा अधिक दृढ केली. इ.स. १९२१ मध्ये कोलकाता येथे जन्मलेल्या सत्यजीत रे यांनी केवळ चित्रपट दिग्दर्शनच नाही, तर लेखन, संगीत, चित्रकला आणि संपादन अशा विविध क्षेत्रांतही आपली छाप सोडली. त्यांचे कुटुंब साहित्य आणि कलाक्षेत्राशी निगडित होते. त्यांचे वडील सुकुमार रे हे प्रसिद्ध साहित्यिक होते, तर आजोबा उपेंद्रकिशोर रे चौधरी हेही नामवंत लेखक व प्रकाशक होते. त्यामुळे कला आणि सर्जनशीलतेचा वारसा त्यांना घरातूनच मिळाला.


रे यांचा पहिला चित्रपट Pather Panchali हा भारतीय सिनेमाच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण, साधी पण प्रभावी कथा आणि उत्कृष्ट दिग्दर्शन यामुळे या चित्रपटाला आंतरराष्ट्रीय स्तरावरही मोठी प्रशंसा मिळाली. या चित्रपटामुळे भारतीय सिनेमाला एक नवी ओळख मिळाली.

यानंतर त्यांनी Aparajito आणि Apur Sansar हे चित्रपट तयार करून 'अपु त्रयी' पूर्ण केली. या त्रयीने मानवी जीवनातील संघर्ष, नातेसंबंध आणि स्वप्नांचे सुंदर चित्रण केले. त्यांच्या इतर उल्लेखनीय चित्रपटांमध्ये Charulata, Goopy Gyne Bagha Byne आणि शतरंज के खिलाडी यांचा समावेश होतो.

सत्यजीत रे यांच्या चित्रपटांची खासियत म्हणजे साधेपणा, वास्तववाद आणि मानवी भावनांचे सूक्ष्म चित्रण. त्यांनी कधीही भव्यता किंवा कृत्रिमता यावर भर दिला नाही, तर वास्तव जीवनातील कथा आणि व्यक्तिरेखा यांना प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांच्या चित्रपटांमध्ये एक वेगळाच प्रामाणिकपणा जाणवतो.

चित्रपटांव्यतिरिक्त त्यांनी 'फेलूदा' आणि 'प्रोफेसर शोंकू' सारख्या गाजलेल्या व्यक्तिरेखा निर्माण केल्या. त्यांच्या कथा आणि कादंबऱ्या आजही वाचकांमध्ये लोकप्रिय आहेत. त्यांनी बालसाहित्य आणि विज्ञानकथांमध्येही मोठे योगदान दिले. त्यांच्या योगदानासाठी त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १९९२ मध्ये त्यांना सिनेमा क्षेत्रातील सर्वोच्च मानला जाणारा Acad-emy Honorary Award प्रदान करण्यात आला. त्याच वर्षी भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान दिला.

आजच्या आधुनिक चित्रपटसृष्टीतही सत्यजीत रे यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. अनेक दिग्दर्शक त्यांच्या शैलीतून प्रेरणा घेतात. वास्तववादी कथानक, सूक्ष्म दिग्दर्शन आणि मानवी भावनांचा अभ्यास यासाठी त्यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याला अभिवादन करताना त्यांच्या चित्रपटांचे पुनरावलोकन करणे आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणे हीच खरी आदरांजली ठरेल. सत्यजीत रे हे केवळ एक दिग्दर्शक नव्हते, तर ते एक संपूर्ण कलावंत होते. ज्यांनी भारतीय संस्कृतीला जागतिक पातळीवर नवी ओळख दिली.



# अमिताभ बच्चन यांना वयाच्या ८३ व्या वर्षीही कोणते व्यसन?


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन वयाच्या ८३ व्या वर्षीही आपल्या कामाप्रती असलेली ओढ आणि शिस्तीसाठी ओळखले जातात. सहा दशकांहून अधिक काळ चित्रपटसृष्टीत सक्रिय असलेल्या बिग बींनी नुकतच एका ब्लॉगद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे, की जर एखाद्या दिवशी त्यांच्याकडे काम नसेल किंवा ठरलेले वेळापत्रक पाळले गेले नाही तर त्यांना खूप अस्वस्थ वाटते.

**अमिताभ बच्चन यांच्या ब्लॉगमध्ये नेमके काय आहे?**

अमिताभ यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे, की एखादा दिवस जो पूर्णपणे 'आळसात' गेला. त्या दिवसात काहीच घडले नाही. पण काम नसणे मला अस्वस्थ करते. जेव्हा तुम्ही रोजच्या ठरलेल्या वेळापत्रकानुसार काम करत नाही, तेव्हा सवयीची ती संपूर्ण साखळी तुटते आणि तो दिवस एक प्रकारचे रहस्य बनतो.

त्यांनी पुढे म्हटले, की माणसाच्या मनात असा विचार येतो की आजचा दिवस आपल्याला हवा तसा का जात नाही? जर आपल्या मनात थोडी जरी समज असेल, तर आपल्या आजूबाजूला शांतता आणि आनंदी वातावरण असावे असे वाटते. पण काही लोकांबाबत असे कधीच घडत नाही आणि हीच चिंतेची बाब असते. चिंतेत जगणे हे शरीर आणि मन दोघांसाठीही हानिकारक आहे. बिग बींना दररोज काम करण्याचे व्यसन आहे जणू, असे त्यांच्या या पोस्टवरून स्पष्ट होते.




# सक्षम राजकारणी : जयंतराव टिळक

स्मृतिदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वातंत्र्यानंतर भारतात राज्यांचे पुनर्गठन भाषिक आधारावर व्हावे, ही मागणी जोर धरत होती. मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र राज्य असावे, या उद्देशाने उभी राहिलेली संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही एक व्यापक आणि जनआंदोलनात्मक चळवळ होती. या चळवळीत अनेक नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, त्यापैकी जयंतराव टिळक हे अग्रगण्य नाव आहे.



जयंतराव टिळक हे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नातू होत. त्यांच्या घराण्यातील राष्ट्रवादी परंपरा आणि सामाजिक बांधिलकी यांचा प्रभाव त्यांच्या कार्यात स्पष्ट दिसून येतो. त्यांनी केवळ राजकारणातच नव्हे, तर पत्रकारिता आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातूनही समाजप्रबोधन केले.

**पत्रकारिता आणि जनजागृती**

जयंतराव टिळक यांनी प्रसिद्ध दैनिक केसरी च्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला बळ दिले. त्यांच्या लेखनात तळमळ, तर्कशुद्धता आणि प्रखर राष्ट्रभक्ती यांचा संगम दिसतो. त्यांनी मराठी अस्मिता, सांस्कृतिक एकात्मता आणि लोकशाही मूल्ये यांचा पुरस्कार केला.

**राजकीय आणि सामाजिक भूमिका**

जयंतराव टिळक हे केवळ आंदोलनकर्ते नव्हते, तर एक सक्षम राजकारणीही होते. त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय भूमिका बजावताना लोकहिताचे प्रश्न मांडले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने संघटित झाली आणि मराठी जनतेचा आवाज बुलंद झाला.

**महाराष्ट्र निर्मितीतील भूमिका**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, हा दिवस संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या यशाचा परिपाक होता. या ऐतिहासिक यशामध्ये जयंतराव टिळक यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी जनतेला एकत्र आणून एक सशक्त चळवळ उभारली.

**स्मृतिदिनाचे महत्त्व**

जयंतराव टिळक यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याची आठवण करून देणे म्हणजे केवळ इतिहासाचा आढावा नव्हे, तर पुढील पिढ्यांना प्रेरणा देणे होय. त्यांच्या विचारांमध्ये आजही सामाजिक बांधिलकी, लोकशाही आणि प्रादेशिक अस्मिता यांचे मूल्य जपण्याचा संदेश आहे. जयंतराव टिळक यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होतेते एक विचारवंत, पत्रकार, समाजसेवक आणि राजकारणी होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांचे योगदान महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प करायला हवा.

# गर्मी में छिपकलियों से परेशान?

## घर में लगाएं ये खास पौधे, खुद ही भाग जाएंगी घर से कई किलोमीटर दूर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गर्मी के मौसम में घरों में छिपकलियों का डेरा लगना आम समस्या है। बच्चों और बुजुर्गों की सुरक्षा के लिए आप अपने घर के गमलों में कुछ खास पौधे लगा सकते हैं। लैवेंडर, तुलसी, नीम, गेंदे और पुदीने के पौधे न सिर्फ खूबसूरत हैं बल्कि उनकी खुशबू और गुण छिपकलियों को घर के आसपास आने से रोकते हैं।

गर्मी के मौसम में घरों में छिपकलियों का डेरा हो जाता है, जिससे बच्चे और बुजुर्ग परेशान रहते हैं। ये छिपकलियां दीवारों से लेकर फर्श तक आ जाती हैं और किसी भी समय नुकसान पहुंचा सकती हैं। यदि आप इनसे निजात पाना चाहते हैं, तो अपने घर के गमले में कुछ खास पौधे लगाएं, जिससे घर में छिपकलियों का खतरा कम हो सके। आप अपने घर के गमले में लैवेंडर का पौधा लगा सकते हैं। यह आमतौर पर इत्र बनाने में इस्तेमाल होता है क्योंकि इसकी खुशबू बहुत अच्छी होती है। इस पौधे पर बैंगनी रंग के सुंदर फूल खिलते हैं। इसमें एंटीसेप्टिक गुण पाए जाते हैं और इसकी खुशबू इतनी तेज होती है कि घर में लगाने पर छिपकलियां आसपास नहीं आएंगी।

औषधीय गुणों से भरपूर तुलसी जितना हमारे स्वास्थ्य के लिए फायदेमंद है, उससे कहीं ज्यादा इसका धार्मिक महत्व है। इसके अलावा ये घरेलू उपयोग में भी काम आती है। इसमें मिथाइल सिनामेट, लिनालूल और कपूर के गुण पाए जाते हैं, जिसकी सुगंध की वजह से छिपकलियां घर के आसपास नहीं आएंगी, इसलिए इसे घर के गमले में लगा दें।

औषधीय गुणों से भरपूर नीम हमारे स्वास्थ्य के लिए फायदेमंद होने के साथ ही इसमें पाए जाने वाले एंटीबैक्टीरियल, एंटी ऑक्सीडेंट गुण शरीर को बहुत फायदा पहुंचाते हैं। इसे घर के आंगन में लगा दें जिससे छिपकलियां घर के आसपास नहीं आएंगी। धार्मिक और सांस्कृतिक रूप से गेंदा का फूल हमारे लिए बहुत उपयोगी है। ये दिखने में बेहद खूबसूरत होता है। साथ ही, गेंदे के फूल में पाइरेथ्रिन और ट्रेपीज नाम के इंसेक्टिसाइड तत्व पाए जाते हैं। जिनकी वजह से छिपकलियां घर के आसपास नहीं आएंगी। इसे आप घर के गमले में लगा सकते हैं। आप अपने घर के गमले में पुदीने का पौधा लगा दें तो आपके घर के आसपास भी छिपकलियां नही आएंगी। दरअसल, इसमें मेंथॉल नामक तत्व पाए जाने के साथ ही इसमें मिंट फ्लेवर होता है।



शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे



# ॥ मंगल ॥ पान

# समृद्धी, शुभारंभ आणि यशाचा सुवर्णयोग

## आज गुरुपुष्यामृत योग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

या दिवशी गंगापूजन-गंगा उत्पत्ती व जागतिक पुस्तक दिनही आहे. केवळ सोने खरेदीच नव्हे, तर आयुष्याला सोन्याची झळाळी देणारा 'गुरुपुष्य' योग. आध्यात्मिक प्रगती, उपासना आणि कोणत्याही शुभ कार्याचा श्रीगणेशा करण्यासाठी २३ एप्रिल २०२६ रोजी एक अत्यंत दुर्मिळ आणि प्रभावी योग जुळून येत आहे, तो म्हणजे 'गुरुपुष्यामृत योग'. या सुवर्ण योगावर केवळ सोने खरेदीला नाही तर आध्यात्मिक विकासालाही महत्त्व द्या. आयुष्याचे नर जन्माचे सार्थक व सोने कसे होईल यासाठी साक्षात गुरुदेव आणि कृष्णमयी या दिव्य विभूतींसोबत साधना करण्याची अमृत संधी सर्वांना मिळत आहे.

गुरुवारी पुष्य नक्षत्र आल्यावर तयार होणारा अत्यंत शुभ आणि दुर्मिळ योग आहे, ज्याला सर्व नक्षत्रांचा राजा मानले जाते. या दिवशी सोने-चांदी, नवीन वाहन किंवा मालमत्ता खरेदी करणे, तसेच नवीन व्यवसाय/गुंतवणूक सुरू करणे. बंद पडलेली कामे पुन्हा सुरू करणे तसेच मनोकामनापूर्ती व संकट मुक्तीसाठी गुरू आदेशित विशिष्ट साधना करणे. अत्यंत लाभदायक मानले जाते. विशेषतः श्री महालक्ष्मीची साधना, पूजा व गुरुपूजन या दिवशी विशेष फलदायी ठरते. ज्यामुळे आर्थिक अडचणी दूर होतात. या दिवशी केलेली पूजा आणि उपाय जीवनातील नकारात्मकता दूर करतात आणि





शुभ फळ देतात.

यामध्ये आणखी दुर्लभ योग म्हणजे या दरम्यान होतो आहे शनी आणि गुरू या दोन बलाढ्य ग्रहांचा मिलाफ हा योग शनी आणि गुरू या दोन बलाढ्य ग्रहांच्या युतीने बनलेला आहे. हे दोन्ही ग्रह साधक आणि उपासक मानले जातात.

**गुरू :** हा ग्रह आपल्याला प्रापंचिक जीवन जगताना धर्माचे अध्यात्माचे गुरू सेवेचे पालन करण्यास आणि कर्तव्यांनंतर परमार्थाकडे वळण्यास शिकवतो. गुरूची सेवा अफाट फळ देणारी असते.

**शनी :** शनी हा शिस्तप्रिय, कडक आणि न्यायी सखा आहे. तो कर्माचा कारक असून आपली प्रत्येक क्षणी परीक्षा घेतो, जेणेकरून आपण आतून घडावे. गुरुपुष्य योगावर साक्षात गुरून समक्ष 'साधना' करणे महत्त्वाचे का?

साक्षात गुरुदेव साधना करून घेणार म्हणजे आदरणीय ब्रह्मा, विष्णू आणि महेश असे तीनही देव. त्यांचे तत्त्व त्यांची शक्ती त्यांची कृपा व आशीर्वाद त्या क्षणी उपस्थित असणार. त्यासोबतच गुरू आणि शनीचे बळ या साधनेसाठी आपल्याला लाभणार आहे म्हणून.

या दिवशी सोने खरेदी करण्याची प्रथा आहे, परंतु केवळ भौतिक सोन्यापेक्षा आपल्या आयुष्याला सोन्यासारखे तेज मिळवून देण्यासाठी साधना करणे अधिक आवश्यक आहे. दासगणू महाराजांनी 'श्री गजानन विजय' ग्रंथात या योगाचे विशेष महत्त्व सांगितले आहे. जो भक्त या दिवशी अनन्यभावे या पोथीचे पारायण करेल, त्याच्या सर्व यातनांचे निरसन होऊन मनोकामना पूर्ण होतात, अशी ग्वाही स्वतः महाराजांनी दिली आहे. म्हणूनच ही साधना जेव्हा गुरू स्वतः आपल्याकडून करवून घेतील, तसेच श्री गुरु सांगतील ते विशिष्ट अध्याय वाचन गुरूंसमोर जेव्हा आपण एकत्र या शुभ मुहूर्तावर आपण करू तेव्हा निश्चितच आपल्या आधि व्याधी, चिंता विवंचना, संकट यातून मुक्तीचे मार्ग तसेच आपल्याला भौतिक व पारलौकिक दोन्हीही मार्ग व आनंद मार्ग खुले होण्यासाठी ही साधना अत्यंत उपयोगास येणार आहे.

दान : शक्य असल्यास सोने किंवा चांदी दान करावे. चण्याची डाळ घरी आणावी. साधू संतांना धान्य दक्षिणा वस्त्र द्यावे. गरिबांना गूळ आणि गहू दान केल्यास पुण्यप्राप्ती होते. कर्माचा आणि ईश्वराचा सुरेख संगम साधण्यासाठी आपल्या मनाने नाही तर गुरूंच्या कथनानुसार गुरू आदेशित योग्य साधना करूया आणि गुरुपुष्यामृताचे अधिक फळ मिळवूया.



# 'हनुमान बाहुक' की उत्पत्ति के पीछे क्या श्रद्धा कहानी है?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुलसीदास जी द्वारा रचित 'हनुमान बाहुक' की उत्पत्ति के पीछे एक बहुत ही मार्मिक और अटूट श्रद्धा की कहानी है। यह केवल एक स्तुति नहीं, बल्कि शारीरिक पीड़ा से मुक्ति पाने के लिए एक भक्त की पुकार है।

कहा जाता है कि अपने जीवन के अंतिम पड़ाव में, जब गोस्वामी तुलसीदास जी काशी (वाराणसी) में रह रहे थे, तब वे कलियुग के प्रकोप के कारण भयंकर शारीरिक व्याधि से घिर गए थे। उनके दाहिने हाथ (भुजा) में अत्यंत तीव्र दर्द और फोड़े-फुंसियां हो गई थीं।

तुलसीदास जी का वह दर्द इतना बढ़ गया था कि उन्हें रात-दिन नींद नहीं आती थी। वे न तो लिख पा रहे थे और न ही ठीक से बैठ पा रहे थे। ऐसा कहा जाता है कि उन्होंने कई औषधियों का प्रयोग किया, लेकिन कोई लाभ नहीं हुआ। विद्वानों का मानना है कि यह पीड़ा उनके प्रारब्ध या कलियुग के प्रभाव के रूप में आई थी।

जब शारीरिक पीड़ा सहनशक्ति से बाहर हो गई, तब तुलसीदास जी ने अपने इष्ट देव और रक्षक हनुमान जी का स्मरण किया। वे जानते थे कि हनुमान जी 'संकटमोचन' हैं और भक्तों के शारीरिक और मानसिक दुखों को हरने वाले हैं।

इसी असहनीय पीड़ा की स्थिति में तुलसीदास जी ने हनुमान जी की स्तुति में ४४ पदों की रचना की। उन्होंने इन पदों में हनुमान जी के बल, बुद्धि और पराक्रम का वर्णन किया और उनसे अपनी भुजा (बाहु) की पीड़ा को हरने की विनती की।

चूँकि यह रचना विशेष रूप से बाहु (भुजा) की पीड़ा के निवारण के लिए की गई थी, इसीलिए इसका नाम 'हनुमान बाहुक' पड़ा। मान्यता है कि जैसे ही तुलसीदास जी ने इस स्तुति को पूर्ण किया, उनकी भुजा का दर्द धीरे-धीरे समाप्त हो गया और वे पूर्णतः स्वस्थ हो गए। हनुमान जी की कृपा से उनके शरीर के सभी घाव भर गए। आज भी हिंदू धर्म में हनुमान बाहुक का पाठ अत्यंत प्रभावशाली माना जाता है। लोग इसका पाठ मुख्य रूप से इन कारणों से करते हैं।

### शारीरिक रोगों से मुक्ति

विशेषकर वात रोग, गठिया या शरीर के किसी भी हिस्से में होने वाले पुराने दर्द के लिए।

### नकारात्मक ऊर्जा से बचाव

ऊपरी बाधाओं या कलियुग के दुष्प्रभावों को शांत करने के लिए।

### अखंड विश्वास

यह सिद्ध करता है कि सच्ची भक्ति में हर दुख को काटने की शक्ति होती है।


# शृंगेरीचे ३३ वे जगद्गुरू शंकराचार्यांनी का म्हटले टेंबे स्वामींना 'साक्षात दत्तप्रभू'?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इ.स. १९०७ मध्ये तंजावर येथे कावेरी तीरावर एक अभूतपूर्व घटना घडली. आपला १७ वा चातुर्मास पूर्ण करून श्रीमद् परमहंस परिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज संचार करत असताना, त्यांची भेट शृंगेरी पीठाचे ३३ वे जगद्गुरू श्री सच्चिदानंद शिवाभिनव नृसिंह भारती महास्वामीजी यांच्याशी झाली. या भेटीत आचार्यांनी टेंबे स्वामी महाराजांच्या कार्याची तुलना थेट श्रीमद् आद्य शंकराचार्यांच्या कार्याशी केली आणि साक्षात दत्तप्रभू असे संबोधले. या दोन्ही महापुरुषांच्या व्यक्तिमत्त्वात आणि धर्मकार्यात अनेक समान धागे आढळतात, ज्याचा उल्लेख या भेटीच्या प्रसंगात अधोरेखित होतो.

ज्याप्रमाणे आद्य शंकराचार्यांनी संपूर्ण भारताचे अनवाणी पायांनी भ्रमण करून विखुरलेल्या धर्माला एकत्र केले. अगदी त्याचप्रमाणे टेंबे स्वामी महाराजांनीही कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत भारतभ्रमण केले. दोघांचेही जीवन हे 'न थांबणारा प्रवास' होते. केवळ धर्माच्या प्रचारासाठी आणि लोकोद्धारासाठी या दोघांनीही हजारो मैलांचा प्रवास पायी केला.

आद्य शंकराचार्यांनी कठीण उपनिषदांवर भाष्यांबरोबरच सामान्यांसाठी अत्यंत रसाळ स्तोत्रे (उदा.- भज गोविंदम्) रचली. टेंबे स्वामी महाराजांचे कार्यही याच धर्तीवर होते. तंजावरच्या भेटीत त्यांनी आचार्यांसमोर तत्काळ 'शारदांबा' आणि 'आद्य शंकराचार्य' यांची स्तोत्रे रचली. तसेच एक मंत्रगर्भ स्तोत्र तयार करून दिले. त्यांच्या बुद्धिमत्तेचा



वेग आणि कवित्व शक्ती पाहून आचार्य प्रसन्न झाले. दोघांनीही संस्कृत भाषेचा वापर करून धर्माची पायाभरणी मजबूत केली.

### गुरुमहाराजचरणरज प्रथमेश

आद्य शंकराचार्यांनी बद्रीनाथ, केदारनाथ यांसारख्या क्षेत्रांचा जीर्णोद्धार केला. त्याचप्रमाणे टेंबे स्वामी महाराजांनीही अनेक दत्त क्षेत्रांचा महिमा पुन्हा जागृत केला. आचार्यांनी जशी संन्यास धर्माची घडी बसवली, तशीच टेंबे स्वामींनी कडक आचारसंहिता आणि वैदिक धर्माचे पालन करून समाजासमोर एक आदर्श ठेवला. या भेटीचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शृंगेरीच्या जगद्गुरूंनी दिलेली मान्यता. त्यांनी उपस्थित मंडळींना सांगितले, की 'हे यति वासुदेवानंद सरस्वती साक्षात दत्तप्रभूच! हे त्यांच्या माता-पितांच्या पुण्याईमुळे अवतरले आहेत.' शंकराचार्यांनी टेंबे स्वामी महाराजांच्या धर्मसंस्थापनेच्या कार्याची तुलना आद्य शंकराचार्यांशी करताना म्हटले, की ज्या शुद्ध हेतूने आद्य आचार्यांनी कार्य केले, तसेच पवित्र कार्य स्वामी महाराज करत आहेत.

स्वामी महाराजांनी आचार्यांच्या सन्मानार्थ सांगितले, की या आचार्यांमुळेच पीठाला शोभा आली आहे. कारण जगद्गुरू श्री सच्चिदानंद शिवाभिनव नृसिंह भारती महास्वामीजी हे शृंगेरी शारदा पीठाचे ३३ वे आचार्य होते. त्यांना आद्य शंकराचार्यांचे पुनरावतार मानले जाते. त्यांचे मुख्य कार्य म्हणजे आद्य शंकराचार्यांचे जन्मस्थान 'कालडी' शोधून तिथे मंदिरांची स्थापना करणे, 'शंकराचार्य जयंती' उत्सवाची सुरूवात करणे आणि विखुरलेले स्तोत्र वाङ्मय संकलित करून अद्वैत सिद्धांताचा प्रचार करणे होय.

१९०७ ची ही भेट म्हणजे केवळ दोन संन्याशांची भेट नव्हती, तर ती आद्य शंकराचार्यांच्या परंपरेने श्रीमत वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांना दत्तावतार म्हणून दिलेली मानाची वंदना होती. आचार्यांनी टेंबे स्वामींना दिलेली ही पावती, त्यांच्या कार्याची व्यापकता आणि आद्य शंकराचार्यांच्या कार्याशी असलेले त्यांचे साम्य स्पष्ट करते. टेंबे स्वामी महाराजांनी देखील आद्य शंकराचार्यांप्रती असलेला आदर 'अनन्यसाधारण' होता. स्वतःच्या मान-अपमानाविषयी उदासीन असलेले टेंबे स्वामी; जगद्गुरू शंकराचार्यांचा अवमान कधीही सहन करत नसत, हे त्यांच्या चरित्रातून वेळोवेळी निदर्शनास येते.

श्री टेंबे स्वामी महाराज म्हणजे 'कर्म आणि भक्ती'चा आदर्श, तर शृंगेरीचे जगद्गुरू म्हणजे 'ज्ञान आणि अधिकारा'चे प्रतीक. १९०७ या वर्षातील ही भेट म्हणजे भारतीय अध्यात्माच्या इतिहासातील एक असा दीपस्तंभ आहे, जो आजही साधकांना दिशा दाखवत आहे.

**॥ श्री गुरुदेव दत्त ॥**

# हनुमान जी को माता जानकी ने कौनसा वरदान दिया था?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमान जी को माता जानकी ने अष्ट सिद्धि (आठ दिव्य शक्तियां) और नव निधि (नौ दिव्य संपदाएं) का वरदान दिया था, जिनके बारे में हनुमान चालीसा में 'अष्ट सिद्धि नव निधि के दाता, अस बर दीन जानकी माता' लिखा है।

### हनुमान जी के पास निम्नलिखित ८ सिद्धियां थीं

**अणिमा सिद्धि :** शरीर को परमाणु (अणु) से भी छोटा करने की शक्ति, जिससे वे सूक्ष्म रूप धारण कर कहीं भी विचरण कर सकते थे।

**महिमा सिद्धि :** शरीर को असीमित रूप से बड़ा (विशाल) करने की शक्ति, जिसे वे समुद्र पार करते समय सुरसा राक्षसी और अशोक वाटिका में सीता जी के सामने प्रयोग किया था।

**गरिमा सिद्धि :** शरीर को अत्यंत भारी (पर्वत जैसा) बनाने की शक्ति, जिसका प्रयोग भीम का घमंड तोड़ने के लिए किया गया था।

**लघिमा सिद्धि :** शरीर को रुई के फाले जैसा हल्का करने की शक्ति, जिससे वे पत्तों पर बैठकर सीता जी से मिल सकते थे।

**प्राप्ति सिद्धि :** किसी भी वस्तु को तुरंत प्राप्त करने, पशु-पक्षियों की भाषा समझने और भविष्य को देखने की शक्ति।

**प्राकाम्य सिद्धि :** इच्छानुसार कहीं भी पहुंचना, पानी में रहना, आकाश में उड़ना और युवावस्था बनाए रखने की शक्ति।

**ईशित्व सिद्धि :** दैवीय शक्तियों पर पूर्ण नियंत्रण रखने की शक्ति, जिससे प्राप्तकर्ता को ईश्वर समान पूजनीय माना जाता है।

**वशित्व सिद्धि :** पशु, पक्षी, मनुष्य और मन पर नियंत्रण रखकर उन्हें वश में करने की शक्ति।

इन शक्तियों के अलावा, नव निधियां (नौ प्रकार की संपत्तियां) जैसे पद्म निधि, महापद्म निधि, नील निधि आदि हैं, जो धन-संपत्ति और सात्विक स्वभाव से संबंधित मानी जाती हैं।




## संस्कारांची शिदोरी

# कुणाकडे जाताना रिकाम्या हाताने का जाऊ नये?


पाहुणचार ही भारतीय संस्कृतीची मोठी ओळख आहे. जसे, की आपण आपल्या घरात आनंदासाठी रोज काहीतरी आणतो, तसेच दुसऱ्याच्या घरी पाहुणे म्हणून जातानाही 'रिकाम्या हाताने कधीही जाऊ नये' हा केवळ एक शिष्टाचार नसून तो एक भावनिक पूल आहे. पाहुणे म्हणून जाताना 'रिकाम्या हाताने' न जाण्याचे महत्त्व नातेसंबंध दृढ करण्यासाठीच नव्हे तर तुमचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध करणारे देखील आहे.

'अतिथी देवो भव' हे आपले ब्रीदवाक्य आहे. पण पाहुणा म्हणून जाताना आपणही काही जबाबदाऱ्या पाळणे गरजेचे असते. रिकाम्या हाताने न जाणे हे त्या घराबद्दलच्या तुमच्या आदराचे आणि प्रेमाचे प्रतीक आहे.

खरेतर यजमानांच्या कष्टाचा आदर म्हणूनही याकडे पाहिले पाहिजे. जेव्हा आपण कुणाकडे जातो तेव्हा समोरची व्यक्ती आपल्यासाठी वेळ काढते, आपल्यासाठी घराची आवरासावर करते आणि आपल्यासाठी प्रेमाने स्वयंपाक म्हणजे ठरवून पाहुणचार करते. अशा घरात आपण सोबत नेलेली एक छोटीशी भेटवस्तू किंवा फळे, ही त्या व्यक्तीच्या आदरभावाची, प्रेमाची, कष्टाची पावती असते. 'तुम्ही आमच्यासाठी जे करताय, त्याचे आम्हाला मोल आहे,' ही हृदयापासून व्यक्त होणारी भावना प्रकट होते.

संबंधांमधील ओलावा आणि जवळीक अधिक गडद करण्यासाठी देखील हे महत्त्वाचे आहे. आपण नेलेली भेटवस्तू किती महागडी आहे यापेक्षा ती आठवणीने आणली आहे, हे महत्त्वाचे असते. लहान मुले असतील तर त्यांच्यासाठी एखादे चॉकलेट किंवा खेळणी, मोठ्यांसाठी फळे किंवा घरातील गृहिणीसाठी एखादी उपयुक्त वस्तू नेल्यामुळे एक वेगळाच जिव्हाळा निर्माण होतो. यामुळे नाते केवळ औपचारिक राहत नाही तर ते अधिक घट्ट होते.

ओझे वाटण्याऐवजी सहभाग वाटणे याकडे आपला नेहमीच कल असावा. कधी-कधी मध्यमवर्गीय कुटुंबात पाहुणे येणार म्हटल्यावर खर्चाचे नियोजन करावे लागते. अशावेळी आपण सोबत नेलेली भेटवस्तू, एखादा मिठाईचा बॉक्स किंवा फळे यामुळे यजमानांच्या खर्चाला नकळत हातभारही लागतो आणि आपण



तेथे ओझे व्हायला गेलो नसून, आनंदाचा वाटा व्हायला गेलो आहोत, हे यातून सिद्ध होते.

या भेटवस्तू नेणे देणे या सवईतून मुलांवर अप्रत्यक्षपणे संस्कार देखील होतात. जेव्हा आपण मुलांसोबत कुणाकडे जातो आणि सोबत काहीतरी घेऊन जातो, तेव्हा मुले नकळत देण्याची वृत्ती शिकतात. गिव्हींग नेचरची छाप त्यांच्यावर पडते. त्यांना समजते, की कुणाच्या घरी जाताना कृतज्ञता कशी व्यक्त करावी. ही छोटीशी सवय त्यांना भविष्यात एक सुसंस्कृत नागरिक बनवते. भेटवस्तू निव्वळ प्रेम वाटावे घ्यावे द्यावे म्हणून महत्त्वाची नाही तर यातून संवादाची सुरेख सुरूवात देखील होते. अनेकदा नवीन ठिकाणी गेल्यावर किंवा खूप वर्ष खंड पडल्यावर जेव्हा आपण जातो तेव्हा सुरूवातीला काय बोलावे, असा प्रश्न पडतो. अशावेळी आपण नेलेली वस्तू संवादासाठी उत्तम साधन ठरते. 'ही आमच्या भागातील प्रसिद्ध मिठाई आहे' किंवा 'हे पुस्तक मला आवडले म्हणून तुमच्यासाठी आणले,' अशा वाक्यांनी गप्पांचा ओघ सहज सुरू होतो आणि संवादात मोकळेपण येते.

रिकाम्या हाताचे 'नकारात्मक' मानसशास्त्र जाणून घेणे देखील तितकेच आवश्यक आहे. रिकाम्या हाताने जाणे हे अनेकदा बेफिकीरपणाचे लक्षण मानले जाते. 'आम्हाला फक्त यायचे होते आणि खायचे होते' असा चुकीचा संदेश (जरी तुमचा हेतू तसा नसला तरी) जाऊ शकतो. याउलट हातात असलेली साधी पिशवी सुद्धा तुमची सज्जनता आणि संवेदनशीलता दर्शविते.

काय नेता येईल? ते काका, मामा मामी काकू येणार म्हणजे नक्की रिकाम्या हाताने येणार नाहीत असे ज्यांच्याकडे जाणार त्यांना हमखास वाटले पाहिजे. मुळातच काही लोक घरी येवूच नयेत असे वाटते परंतु काहीतरी नेण्याची सवय तुमची इमेज बदलू शकते.

अगदी फार मौल्यवान काही नेले पाहिजे असेच काही नाही. लहान मुले असल्यास बिस्किटे, चॉकलेट्स, रंगपेटी किंवा गोष्टींचे पुस्तक आणि मोठी माणसे असल्यास फळे, सुका मेवा किंवा त्यांच्या आवडीचे एखादे खाद्यपदार्थ. कुणी आजारी असेल तर त्यांचे साठी योग्य असे काही किंवा गृहिणीसाठीवल रोपाची कुंडी, एखादी शोभेची वस्तू किंवा किचनमधील उपयुक्त साधन. अगदी काहीच सुचले नाही तर फुलांचा गुच्छ किंवा साधी मिठाई देखील पुरेशी असते.

थोडक्यात सांगायचे तर पाहुणे म्हणून जाताना सोबत नेलेली वस्तू ही खरेदी किंवा खर्च नसून तो यजमानांच्या आदरातिथ्याला दिलेला एक मानाचा मुजरा असतो. यामुळे देणाऱ्या आणि घेणाऱ्या अशा दोघांनाही आत्मिक समाधान मिळते. आणि परस्पर स्नेह भाव अधिक वृध्दींगत होत जातो हे नक्की.

तुम्ही ही सवय अंगीकारली आहे का? नसेल तर आजपासून निर्धार करा की कुणाकडेही जाताना किमान काही घेऊनच जाऊ.

**– धनंजय सोनार,**
**सामाजिक कार्यकर्ते,**
**अमळनेर.**
**मो. : 79728 81440**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)